**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य पुणे ४११००१**
Web : www.dhepune.gov E-mail : budget.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. अर्थस-२०१६ (४१/१६) लेखा -२ - 8189 दि. ११ जूलै २०१६

प्रति,

१. प्राचार्य, सर्व शासकीय अध्यापक महाविद्यालये
२. प्राचार्य / संचालक,सर्व शासकीय कला महाविद्यालये / संस्था
३. प्राचार्य / संचालक,सर्व शासकीय विज्ञान महाविद्यालये / संस्था
४. प्राचार्य / संचालक शासकीय वाणिज्य महाविद्यालये / संस्था मुंबई
५. प्राचार्य शासकीय विधी महाविद्यालय मुंबई.
६. संचालक, शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, मुंबई, औरंगाबाद व नागपूर
७. संचालक, सर्व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे
८. अधिक्षक, सर्व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहे,
९. अधिक्षक शासकीय महाविद्यालये मुलांचे वसतिगृहे मुंबई,
१०. अधिक्षिका, सावित्रीदेवी फुले महिला छात्रालय मुंबई , तेलंग स्मारक मुलीचे वसतिगृह मुंबई
११. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण सर्व विभाग ,सहसंचालक शिक्षण शुल्क समिती मुंबई

**विषय - सन २०१६-१७ योजनांतर्गत योजना (Plan)व योजनेतर योजना (Non Plan ) मधील खर्चाचा आढावा बैठक**

सन २०१६-१७ साठी योजनातर्गत योजना व योजनेतर योजना मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी संचालनालयाच्या अधिपत्याखालील आहरण व संवितरण अधिकारी यांना बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला आहे. यामध्ये पहिल्या तिमाई मध्ये ३० जून २०१६ अखेरपर्यत कमी प्रमाणात खर्च झाल्याचे दिसून येते. सन २०१६-१७ साठी विविध उद्दिष्टाखाली उपलब्ध करुन देण्यात आलेली तरतुद पुर्णपणे खर्च होण्याच्या अनुषंगाने **मा.संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य् पुणे -१ यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६ जुलै २०१६ रोजी, नौरोजी वाडीया महाविद्यालय,** (सेमीनॉर हॉल) **पुणे येथे सकाळी ठीक ११.०० वा. बैठक** आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर बेठकीस विहित केलेल्या वेळेत खर्चाच्या कागदपत्रासह उपस्थित रहावे.

**बैठकीचे विषय -**

१. सन २०१५-१६ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च योजनांतर्गत योजना व योजनेतर योजना निहाय, उद्दिष्टनिहाय देण्यात यावा.

२. सन २०१६-१७- एप्रिल ते जून २०१६ पर्यत झालेला खर्च योजना व योजनेतील उद्दिष्टनिहाय देण्यात यावा.

३. मोठी बांधकामे - i ) मोठी बांधकामावर सन २०१५-१६ साठी झालेला प्रत्यक्ष खर्च ii ) सन २०१६-१७ साठी अर्थसंकल्पित तरतुद, सदरची बांधकामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक असणारा निधी याबाबतची माहिती विवरणपत्र GP १४ मध्ये देण्यात यावी. (विवरण पत्र GP १४ संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

ii) शासन निर्णय दि २० मे २०१३ अन्वये मंजूर केलेली मुलींची वसतिगृहे बांधकामाचे प्रस्ताव अदयापही संबधित संस्था व महाविद्यालय यानी सादर केलेले नाहीत त्यांनी ते सादर करावेत.

iii) दि.२७ मे २०१६ अन्वये सन २०१६-१७ साठी गौणबांधकामांतर्गत प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत. ज्या संस्था / महाविद्यालयांनी अदयाप ही प्रस्ताव सादर केलेले नाहीत त्यांनी दि.१६/७/२०१६ रोजी सादर करावेत.

४.शासन निर्णय दि.३० ऑक्टोबर २०१५ मधील तरतुदीनूसार दि.१२ फेब्रवारी नंतर वित्तीय मान्यता प्रदान करता येत नाहीत. दि.२५/४/२०१६ नूसार दिलेल्या वेळापत्रकांनूसार सर्व महाविद्यालय/ संस्थानी खरेदी प्रस्ताव सादर करुन वित्तीय मान्यता प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही करणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने खरेदी प्रस्ताव तात्काळ सादर करण्यात यावेत.

५. योजनेतर योजना मध्ये विविध उद्यिष्टासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी अदयापही काही महाविद्यालय /संस्था यांनी खर्च केलेला नाही. याबाबतचा आढावा

६. खर्चमेळ - ऑन लाईन केलेला खर्च मेळ याचा आढावा

८. जिल्हा नियोजन व विकास समिती यांनी सन २०१५-१६ साठी मंजूर केलेल्या तरतुदीमधून झालेला प्रत्यक्ष खर्च, सन २०१६-१७ साठी मंजूर केलेली तरतूदी याबाबतची माहिती विवरणपत्र १५ अ, ब, क, मध्ये देण्यात यावी. (सदरचे विवरण पत्र संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

९.शासन निर्णय दि.३० ऑक्टोबर २०१५ नूसार खरेदीची कोणतेही देयके दि.१५ मार्च नंतर कोषागारात स्विकारणार नाहीत. त्याअनुषंगाने सर्व खरेदीचे नियोजन

१०. अर्थसंकल्पित तरतुद विहित मुदतीत खर्च न झाल्यामुळे तरतुदीमध्ये कपात करण्यात येते परिणामी तरतुद कमी पडते. तरी कॅशफलो प्रमाणे तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करणे.

११. सन २००१ ते २०१५-१६ मधील खर्चाची माहिती संचालनालयाचे दि.१३ जून २०१६ चे पत्रान्वये मागविण्यात आलेली आहे. ती विहित विवरणपत्रामधील माहिती सोबत आणून सादर करावी.

१२. शिष्यवृत्ती योजना मधील अर्थसंकल्पित तरतुद, सदरची तरतुद पुर्णपणे खर्च करण्याबाबत करावयाचे नियोजन

१३. संचालनालय स्तरावर महाविद्यालय व विद्यापीठ शाखा मधील योजनांना अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने सादर करावयाचे प्रस्ताव , तसेच अर्थसंकल्पित तरतुद पूर्णपणे खर्च होण्याबाबतचे नियोजन

उपरोक्त माहिती , विवरण पत्रे तसेच योजनेतर योजनामध्ये उद्यिष्ट निहाय बीम्स वरील उपलब्ध तरतुद त्यां अनुषंगाने झालेला खर्च याबाबतची माहितीसह बैठकीस उपस्थित रहावे.

(डॉ. धनराज माने) 11/7
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण्)
महाराष्ट्र राज्य् पुणे -१

प्रत,

१.प्रशासन अधिकारी प्रशा -३ कार्यासन २. प्रशासन अधिकारी शिष्यवृत्ती शाखा
३. प्रशासन अधिकारी मवि -१ व २ ,३ कार्यासन

## विवरणपत्र GP-१४ (२०१७-१८)

### शासकीय महाविद्यालये/ संस्था / विभागीय् कार्यालये / वसतिगृहे यामध्ये चालु असलेली मोठी बांधकामाचा तपशील

महाविद्यालय / संस्था / कार्यालय / वसतिगृहाचे नाव- (रक्कम रु हजारात)

| अ. क्र. | चालु असलेल्या बांधकामाचा तपशील | प्रशासकीय मान्यतेचा आदेश क्र. व रक्कम | मार्च २०१५ अखेर पर्यत प्रत्यक्ष झालेला खर्च | सन २०१५-१६ मंजुर तरतूद | | | एकूण (४ ते ६) अर्थसंकल्पिय तरतूद १५-१६ | बी.डी.एस वर उपलब्ध तरतूद | सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये झालेला खर्च | एकूण प्रत्यक्ष खर्च (४+९) | सन २०१६-१७ साठी अर्थ संकल्पित तरतुद | सन २०१७-१८ साठी अपेक्षित तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | मुळ अर्थसंकल्पिय तरतूद | पुरक मागणी | सुधारीत अंदाज | | | | | | | |

( कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी )

सूचना - १. एकापेक्षा जास्त बांधकामे चालू असल्यास प्रत्येक बांधकाम निहाय माहिती देण्यात यावी.

२. यामध्ये फक्त मोठया बांधकामाची माहिती देण्यात यावी. गौणबांधकामाची माहिती यामध्ये देण्यात येवू नये.

३. सन २०१६-१७ साठी अर्थसंकल्पित करण्यातआलेली तरतुदोंची माहिती दि.२६ मे २०१६ च्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे.

४. बांधकामावर झालेला खर्च तसेच बांधकामासाठी अपेक्षित तरतूद याबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेण्यात यावी. याबाबत संबधीत सार्वजनिक बाधंकाम विभागाकडील पत्र जोडावे.

५. बांधकामाची प्रशासकीय मान्यतेची रक्कम, माहे मार्च २०१६ पर्यत झालेला खर्च , सन २०१६-१७ साठी अर्थसंकल्पित करण्यात आलेली तरतुद विचारात घेवून सन २०१७-१८ साठी अपेक्षित तरतूद प्रस्तावित करण्यात यावी.

६.बांधकाम पूर्ण होण्याच्या अनुषंगाने अधिकची किती तरतूद आवश्यक आहे. (सार्वजनिक बांधकाम विभागाचे पत्रासह माहिती द्यावी.)

-------------------

## विवरणपत्र - १५ (अ)

## जिल्हा वार्षिक योजना (DPDC) सन २०१५-१६ खर्चाचे विवरण

महाविद्यालय/ संस्था नाव-

(रक्कम हजारांत)

| अ.क्र. | खरेदी / बांधकाम / इतर बाबतचा तपशील | मंजुर तरतुद सन २०१५-१६ | बीम्स प्रणाली वर उपलब्ध तरतुद | प्रत्यक्ष झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | एकुण | | | |

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

---

## विवरणपत्र - १५ (ब)

## जिल्हा वार्षिक योजना (DPDC) सन २०१६-१७

महाविद्यालय/ संस्था नाव-

(रक्कम हजारांत)

| अ.क्र. | मंजुर तरतुद सन २०१६-१७ | उद्दिष्टे | | | बीम्स प्रणाली वर उपलब्ध तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | खरेदी | बांधकाम | इतर | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | एकुण | | | | |

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

टीप - मंजुर तरतुदीबाबत जिल्हा नियोजन व विकास यांचे पत्र जोडावे

---

## विवरणपत्र - १५ (क)

## जिल्हा वार्षिक योजना (DPDC) सन २०१७-१८

महाविद्यालय/ संस्था नाव-

(रक्कम हजारांत)

| अ.क्र. | मंजुर तरतुद सन २०१७-१८ | उद्दिष्टे | | | प्रस्तावित खरेदी/ बांधकाम / इतर बाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| | | खरेदी | बांधकाम | इतर | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | एकुण | | | | |

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

टिप- तरतुद उपलब्ध नसल्यास माहिती निरंक देण्यात यावी.